**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार यांचे कार्यालय**
**नवीन प्रशासकीय इमारत, टोकर तलाव रोड,नंदुरबार पिन- ४२५४१२**
**(टंचाई शाखा)**

---

क्र./टंचाई/कावि/95/2026

नंदुरबार दिनांक :- 23/04/2026

## पिण्याचे पाणी वाहतूक ई-निविदा (2025-26)

नंदुरबार जिल्ह्यामध्ये दिनांक 07/05/2026 ते 30/06/2026 या कालावधीत टंचाईग्रस्त गावांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या टँकर पुरवठादार संस्था/व्यक्ती कडून ई-निविदा (ऑनलाईन) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. निवड होणा-या संस्थेस/व्यक्तीस 6000 ते 12000 लिटर किंवा आवश्यकतेनुसार त्यापेक्षा अधिक क्षमतेचे टँकर पुरवावे लागतील. निविदा संबंधीची सर्व माहिती व अटी-शर्ती www.Nandurbar.nic.in व https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा भरणा-या टँकर पुरवठादार संस्थेने/व्यक्तीने ऑनलाईन (Digital Signature Certificate) प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

| **ई-निविदा भरणेचा कालावधी** | **ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ** |
|---|---|
| दिनांक 28/04/2026 (वार- मंगळवार) सकाळी 11.00 पासून 05/05/2026 (वार मंगळवार) रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यत. | दि.06/05/2026 (वार- बुधवार) रोजी दुपारी.01-00 वा. स्थळ:- जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार |

1. **निविदेची विक्री किंमत** - ई-निविदेचे फॉर्म दि.28/04/2026 ते दि.05/05/2026 या कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फॉर्म फी रक्कम रु. 14,000/- (अक्षरी- रु चौदा हजार मात्र) ना-परतावा रक्कम Online Net Banking या ऑप्शनव्दारे ऑनलाईन भरणा केल्यानंतर डाऊनलोड करता येतील. त्याबाबतचा तपशिल निविदेसोबत स्कॅन करून अपलोड करावा लागेल.
2. **बयाना रक्कम** - ई-निविदा बयाणा रक्कम रु.1,40,000/- (अक्षरी रु. एक लाख चाळीस हजार मात्र) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online Net Banking या ऑप्शनव्दारे ऑनलाईन भरणा करावा.
3. **सुरक्षा ठेव-**

   **अ)** रक्कम रु.3,00,000/-(रु.तीन लक्ष मात्र) ची सुरक्षा ठेव आवश्यक राहील.

   **ब)** सुरक्षा ठेव जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे नावाने नंदुरबार येथे वटणा-या राष्ट्रीयकृत बँकेची बँक हमी /मुदत ठेव पावती(FDR) स्वरुपात देणे आवश्यक आहे.
4. ई- निविदा दिनांक 06/05/2026 वेळ दुपारी 01-00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे उघडण्यात येतील.
5. कामाचा कालावधी हा दिनांक 07/05/2026 (अथवा निविदा मंजूरीचे दिनांकापासून) ते 30/06/2026 पर्यत राहिल.

6. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी,नंदुरबार यांनी राखुन ठेवले आहेत.

7. प्रस्तूत ई-निविदा ही www.Nandurbar.nic.in व https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर पाहावयास मिळेल. सदर निविदा डाऊनलोड करुन प्रिंट घेऊन ई-निविदा भरुन निविदेच्या प्रत्येक पानावर (फॉर्मसह) सही/शिक्का केलेली निविदा, निविदेची किंमत रु.14,000/- व बयाना रक्कम रु.1,40,000/- चा Online Net Banking या ऑप्शनव्दारे ऑनलाईन भरणा केलेबाबत तपशिलाची प्रत, बॅक गॅरंटी/ मुदत ठेव पावती इत्यादी सर्व स्कॅन करुन अपलोड करावी.

8. निविदेसंबंधी उपरोक्त तारखांमध्ये फेरबदल झाल्यास त्याची सुचना मुद्दा क्रमांक 7 मध्ये नमूद केलेल्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल. व्यक्तिगत सुचना देणेत येणार नाही.

9. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शा.परिपत्रक क्र.जी.एस.टी-2017/प्र.क्र.81/कराधान-1 दि. 19 ऑगस्ट, 2017 अन्वये **G.S.T** च्या कराचा बोज्याचा विचार करुनच निविदा सादर करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहे. त्यानुसारच निविदाधारकाने निविदेचे दर सादर करतांना **G.S.T** च्या कराचा बोज्याचा विचार करुनच दर सादर करावेत. तसेच शासनाने **GST** संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले व करण्यात येणारे दर लागु राहतील.

10. निविदाकाराने ज्या नावाने ई-निविदा भरलेली त्यांचे **G.S.T** नोंदणी प्रमाणपत्र.

( धनंजय गोगटे)
**जिल्हाधिकारी नंदुरबार**

## जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

## पिण्याचे पाणी वाहतूक ई-निविदा

---

**क्र./टंचाई/कावि/95/2026** **नंदुरबार दिनांक:-** 23/04/2026

नंदुरबार जिल्ह्याध्ये दिनांक 07/05/2026 ते 30/06/2026 या कालावधीत टंचाईग्रस्त गावांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या टँकर पुरवठादार संस्थां/व्यक्ती कडून ई-निविदा (ऑनलाईन) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. निवड होणा-या संस्थेस/व्यक्तीस सर्वसाधारण 6000 ते 12000 लिटर किंवा आवश्यकतेनुसार त्यापेक्षा अधिक क्षमतेचे टँकर पुरवावे लागतील.

**ई-निविदा मिळण्याचे ठिकाण** - ई-निविदा **www.Nandurbar.nic.in** व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. सदर निविदा संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येईल.

**ई-निविदेची फॉर्म प्राप्त करणेची पध्दत व फी** -

ई-निविदेचे फॉर्म दि.28/04/2026 ते दि.05/05/2026 या कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फॉर्म फि ऑनलाईन ना-परतावा रक्कम रु. 14,000/- (अक्षरी- रु चौदा हजार मात्र) Online Net Banking या ऑप्शनव्दारे ऑनलाईन भरणा केल्यानंतर डाऊनलोड करता येतील. त्याबाबतचा तपशिल निविदेसोबत स्कॅन करून अपलोड करावा लागेल.

**ई-निविदेसोबत अनामत रक्कम (बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत)** -

1. **बयाना रक्कम** - ई-निविदा बयाणा रक्कम रु.1,40,000/- (अक्षरी रु. एक लाख चाळीस हजार मात्र) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online Net Banking या ऑप्शनव्दारे ऑनलाईन भरणा करावा.
2. **सुरक्षा ठेव** -

   **अ.** रु.3,00,000/- (रु.तीन लाख मात्र) ची सुरक्षा ठेव/मुदत ठेव पावती आवश्यक राहिल.

   **ब.** सुरक्षा ठेव जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे नावाने नंदुरबार येथे वटणा-या राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक हमी/मुदत ठेव पावती (FDR)स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदर बँक हमीचा कालावधी 30/09/2027 पर्यंतचा असणे आवश्यक आहे.

**ई-निविदा सादर करण्याची पध्दती** -

1. ई-निविदा ही दोन लिफाफे पध्दतीने (व्दी लिफाफा) सादर करावी लागेल.
2. दोन लिफाफ्यापैकी लिफाफा क्र.1 हा **तांत्रिक लिफाफा** असेल व लिफाफा क्र.2 हा **व्यापारी लिफाफा** (वाहतूक दराचा) असेल. ई-निविदा www.Nandurbar.nic.in **व** https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पाहावयास मिळेल. सदर निविदा डाऊनलोड करुन प्रिंट घेऊन ई-निविदा भरुन निविदेच्या प्रत्येक पानावर (फॉर्मसह) सही/शिक्का केलेली निविदा, निविदेची किंमत रु.14000/- व बयाना रकम रु.1,40,000/- चा Online Net Banking या ऑप्शनव्दारे ऑनलाईन भरणा केलेबाबत तपशिलाची प्रत, निविदाधारकाने ई-निविदेच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन निविदा इत्यादी सर्व स्कॅन करुन अपलोड करावी. लिफाफा क्र.2 पाणी पुरवठा वाहतूक दराचा राहिल.
3. व्यापारी लिफाफा (लिफाफा क्र.२) हा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.

**तांत्रिक व व्यापारी लिफाफ्यात निविदाधारकाने खालीलप्रमाणे स्वस्वाक्षांकित कागदपत्रे सादर करावीत.**

**(अ) तांत्रिक लिफाफा -**

1. तांत्रिक लिफाफ्यातील खालील कागदपत्रे स्कॅन करुन https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावीत. तसेच निविदा फी व बयाणा रक्कम भरले बाबतची कागदपत्रे सादर करावीत.
2. पाणी वाहतुकीचे काम केलेबाबत अनुभव असल्यास प्राधान्याने विचार केला जाईल.
3. दिनांक 31/03/2025 अखेर आयकर थकबाकी नसलेबाबतचा सनदी लेखापालांचे प्रमाणपत्र
4. पॅन कार्डची साक्षांकित प्रत.
5. GST नोंदणी प्रमाणपत्र व मागील 3 वर्षाचे GST चे प्रमाणित ऑडीट रिपोर्ट.
6. किमान 10 गाडयांचे रजिस्ट्रेशन केल्याचा पुरावा (आर.सी.बुकाच्या झेरॉक्स प्रमाणीत प्रती)
7. आर.टी.ओ.कडील टॅक्स भरणा केल्याचे गतवर्षाचे प्रमाणपत्र.
8. किमान 10 टँकर चे नोंदणी प्रमाणपत्र (R.C.), टॅक्स भरणा पावती, व्यवसाय कर, वैध प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र व पासिंग बाबत कागदपत्र.
9. निविदाधारक संस्था प्रोप्रायटरशिप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड, सहकारी संस्था इत्यादी ज्या प्रकारची असेल त्याप्रमाणे सक्षम प्राधिका-याकडे तीची नोंदणी केल्याचे नोंदणी प्रमाणपत्र.
10. संस्थेच्या उलाढालीचा व रोख भांडवलाचा तपशिला संबंधी पुरावे
    अ. सनदी लेखापाल अथवा वैधानिक लेखापरिक्षण अधिकारी यांनी प्रमाणीत केलेला मागील तीन वर्षाचा (2022-23, 2023-24, 2024-25) ताळेबंद (बॅलन्सशिट)
    ब. मागील तीन वर्षाचे (2022-23, 2023-24, 2024-25) उलाढाल (**Turn Over**) बाबत सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र
11. **तसेच टँकर खेपांच्या पर्यवेक्षणासाठी संगणकीय पर्यवेक्षण प्रणाली (GPS System) विकसित करण्यात आलेली असून सदर प्रणालीचा वापर करणे निविदाधारकांस बंधनकारक राहील.**
12. निविदाधारक संस्था टँकर पुरवठ्याचे काम करण्यास तयार असलेबाबत तसेच त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास जबाबदार राहील अश्या आशयाचा संस्थेच्या सर्व संचालकांच्या स्वाक्षरीचा ठराव.(प्रपत्र-1)/लागू असल्यास
13. निविदाधारक संस्थेने निविदेच्या कामकाजा संबधी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस दिलेले Bidder's Power of Attorney (प्रपत्र-3)
14. निविदाधारक संस्थेची परिपूर्ण भरलेली माहिती.(प्रपत्र-5)
15. निविदेतील अटी शर्ती माहिती व मान्य असल्याबाबत प्रत्येक पानावर निविदाधारकाने स्वाक्षरी केलेला मुळ निविदादस्त (टेंडर डाक्युमेंट)
16. संस्था मागणी प्रमाणे टँकर पुरविणेस समर्थ असलेबाबत संस्थेचे हमी पत्र व सुरक्षा ठेव सादर करणार बाबतचे हमीपत्र व काळ्या यादीत नसल्याचे हमीपत्र.

(ब) **व्यापारी लिफाफा** (दराबाबतचा लिफाफा):-

व्यापारी लिफाफा (लिफाफा क्र.२) हा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.

**ई- निविदेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत -**

1) व्यक्तिगत निविदा/संस्थेच्या निविदा स्विकारल्या जातील.( संस्था प्रोप्रायटरशिप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड, सहकारी संस्था इत्यादी)

2) **अ)** रु.3,00,000/- (रु. तीन लाख मात्र) ची सुरक्षा ठेव आवश्यक राहील. **ब)** सुरक्षा ठेव नंदुरबार येथे वटणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक हमी/मुदत ठेव पावती स्वरुपात देणे आवश्यक आहे.

3) वाहन टाकीसह सुस्थितीत असणे आवश्यक आहे.

4) यशस्वी निविदा धारकास आवश्यकते प्रमाणे टँकर्स पुरवठा करणे बंधनकारक राहील. निविदा धारकाकडे स्वतःची अथवा संस्थेच्या सभासंदाच्या मालकीची किमान 10 टँकर्स असणे बंधनकारक आहे.

5) **पाणी पुरवठयाकामी उपलब्ध करून देण्यात येणा-या प्रत्येक टँकरवर जीपीएस प्रणाली निविदाधारकाने स्वखर्चाने बसविणे बंधनकारक राहिल. सदर यंत्रणा बसविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती इ.चा खर्च निविदाधारक यांनी स्वंतः करावा लागेल तसेच GPS यंत्रणेचे Traking व Monitering (संनियंत्रण) करणेसाठी आवश्यक बाबींची पुर्तता करणेची जबाबदारी संबंधित निविदाधारक याची राहील.**

6) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक दि. 4 जानेवारी 2014 नुसार टँकरची देयके अदा करताना टँकरवर जी.पी.एस प्रणाली बसविलेली असणे व जी पी एस प्रणालीवर ज्या टँकरच्या फे-यांची नोंद होईल त्याच फे-या देयकांकरीता अनुज्ञेय राहतील. ज्या पाणी पुरवठा करणा-या टँकरवर जी पी एस प्रणाली किंवा जी पी एस प्रणाली असूनही त्या बंद असल्याकारणाने टँकर वाहतूक धारकाच्या फे-या झाल्याचा दावा केला असल्यास अशा फे-या बनावट ठरतील व त्यासाठी देयक अदा केले जाणार नाही. याची निविदाधारक यांनी नोंद घ्यावी.

7) जी पी एस प्रणालीच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी **कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांची राहील.** त्यांनी जी पी एस प्रणालीवर नोंदविण्यात येणा-या दैनदिन खेपांचा अहवाल दररोज संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांना तालुक्याचे उपअभियंता यांचेमार्फत सादर करावा.

8) टँकर पुरवठा करण्याचे आदेश दिल्यानंतर यशस्वी निविदाधारकास टँकर संबंधीत तालुका मुख्यालयातील गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात प्रथमतः उपस्थित करावा लागेल. तेथे किलो मीटर रिडींग घेणेत येईल, तसेच टँकर बंद करण्याचे आदेश झालेनंतर टँकर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित करुन त्याचे मीटर रिडींग दयावे लागेल. गटविकास अधिकारी कार्यालयापर्यंत टँकर आणण्यासाठी किंवा गटविकास अधिकारी कार्यालयातून टँकर त्याचे मूळ ठिकाणी नेण्यापर्यंतचे अंतराचे वाहतूक भाडे देण्यात येणार नाही.

9) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-टंचाई-2018/प्रक्र-167/पापु-14, दिनांक 19 डिसेंबर, 2018 नुसार टँकर्सचे प्रति 1 मे. टन वहन क्षमता प्रतिदिन व प्रति कि.मी. चे दर शासनाने निश्चित केलेल्या कमाल दरांपेक्षा कमी असावेत. तसेच अट क्र. 2 नुसार टँकरच्या पाण्याच्या टाकीची वहन आर.टी.ओ यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

10) यशस्वी निविदाधारकास त्यानी पुरवठा केलेल्या टँकरला ठरवून देण्यात आलेल्या दैनिक खेपा करणे बंधनकारक राहील. अशा खेपा करण्यास कसूर झाल्यास वाहतूक भाडे अदा करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे कमी झालेल्या खेपांच्या प्रमाणात दैनिक भाडयातही कपात करण्यात येईल.

11) प्रत्येक टँकरच्या प्रमाणित क्षमतेनुसार प्रतिदिन भाडे व प्रति किलोमीटर भाडे आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर अदा करण्यांत येईल. यशस्वी निविदाधारकास त्रैमासिक देयके सादर करावे लागेल.

12) टँकरवर काम करणा-या कर्मचाऱ्यांचे (अधिकृत वाहन चालक व मदतनिस) वेतन व भत्ते तसेच टँकरसाठी लागणारे तेल, इंधन व इतर खर्च वाहन मालकानेच अदा करावयाचे आहेत. यासाठी वाहनामध्ये इंधन

भरणेबाबत निविदाधारकाने स्वतंत्र व्यवस्था करावी. तसेच इंधन व इतर वाहन खर्चात वाढ झाल्यास दरात वाढ करुन मिळणार नाही.

13) यशस्वी निविदाधारकास किंवा त्यांनी पुरवठा केलेल्या टँकरला कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. त्याचप्रमाणे शासनामार्फत इंधन पुरवठा केला जाणार नाही.

14) यशस्वी निविदाधारकांस निविदा मंजूर झाल्यानंतर 15 दिवसात प्रपत्र 7 मधील वाहन तपशिलासंबंधी विवरणपत्र प्रमाणित करुन सादर करावे लागेल.

15) मंजूर झालेल्या निविदा धारकास रु.500/- किंमतीचे मुद्रांक स्टँम्पपेपरवर पंधरा दिवसात विहीत अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करुन द्यावा लागेल. सदरचा करारनामा दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदवावा लागेल व त्यासाठी येणारा खर्च संबंधीत ठेकेदार यांना करावा लागेल. मुदतीत करारनामा न करून दिल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

16) संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना तालुक्याच्या ठिकाणी स्वतंत्र पर्यवेक्षक तथा समन्वयक कर्मचारी नेमावा लागेल. त्याच्यावर प्रत्येक टँकरच्या रोज होणाऱ्या खेपांची माहिती घेणेची जबाबदारी राहील.

17) यशस्वी निविदाधारकास ठरवून दिलेल्या मुदतीत कार्यक्षमतेने व करारनाम्यातील अटी व शर्तींप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याची निविदा रद्द करणेत येईल व बयाणा रक्कम व सुरक्षा ठेव जप्त करणेत येईल. याशिवाय, दुस-या न्यूनतम यशस्वी (एल-2) निविदाधारकाकडून काम करुन घेण्यात आल्यास त्याकरीता होणारा जादा खर्च मूळ यशस्वी निविदाधारकाकडून वसूल करणेत येईल.

18) नंदुराबार जिल्ह्यातील टंचाईग्रस्त क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची वाहतूक जिथे पाणी उपलब्ध असेल त्याठिकाणाहून करावी लागेल. कोणत्याही कारणास्तव पाणी पुरवठा बंद असल्यास त्या कालावधीचे भाडे देण्यात येणार नाही.

19) टँकरने पाणी पुरवठा करण्याचे काम अधिक सुलभतेने व कार्यक्षमतेने होण्यासाठी एखादा पाण्याचा स्त्रोत यशस्वी निविदाधारकाने सुचविल्यास व तो योग्य असल्याची खातरजमा गटविकास अधिकारी यांची झाल्यास तो अधिग्रहीत करुन देण्यात येईल.

20) शासन नियमाप्रमाणे बिलातून आयकर व त्यावरील सरचार्ज तसेच रक्कम रुपये 2.5 लक्षपेक्षा पुढे GST कापून घेणेत येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची किंवा दोन्हीही मागणी केल्यास त्याची भरपाई निविदाधारकास करावी लागेल.

21) पाणी वाहतुक कालावधी दरम्यान टँकरचा देखभाल व दुरुस्ती खर्च हा टँकर मालकांस करावा लागेल. टँकर नादुरुस्त झाल्यास त्याची दुरुस्ती तात्काळ करण्यात येऊन पाणी वाहतूकीत कुठल्याही प्रकारचा खंड पडता कामा नये. नादुरुस्त टँकर जर ताबडतोब दुरुस्त होणार नसेल तर त्वरीत पर्यायी टँकरची व्यवस्था यशस्वी निविदाधारकास करावी लागेल. 24 तासांत पर्यायी टँकर उपलब्ध करुन न दिल्यास प्रतिदिन प्रतिटँकर रु.2000/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार संबंधीत गट विकास अधिकारी यांना राहतील.

22) **टँकरला कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास वा वाहनाने कोणत्याही प्रकारचे नुकसान केल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी यशस्वी निविदाधारकांची/टँकर चालक व टँकर मालकाची राहील, याबाबत शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. त्यासाठी शासनाकडून कोणताही मोबदला/ नुकसान भरपाई दिली जाणार नाही याबाबत शासना विरोधात नुकसान भरपाईचा दावा करता येणार नाही.**

23) **टँकरद्वारे पाणी पुरवठा निविदा कालावधीत यशस्वी निविदाधारकाने (ठेकेदाराने) इतर कोणत्याही व्यक्ती/संस्थेशी केलेला करार/ खाजगी व्यवहाराची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची/ठेकेदाराची राहील.**

24) पाणी वाहतुकीसाठी पुरविलेल्या टँकरचे स्पिडोमिटर सुस्थीतीत ठेवणे ही जबाबदारी यशस्वी निविदाधारक यांची राहिल.

25) संबंधित गटविकास अधिकारी यांनी प्रत्येक टँकरला खेपा ठरवून देताना त्या वस्तूनिष्ठ असाव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याबाबत यशस्वी निविदाधारकास काही आक्षेप असल्यास 8 (आठ) दिवसामध्ये त्यांनी गटविकास अधिकारी यांचेकडे याबाबत लेखी निवेदन द्यावे. त्यावर गटविकास अधिकारी घेतील तो निर्णय अंतिम राहील. एकदा खेपा ठरवून दिल्यानंतर तेवढ्या खेपा करणे यशस्वी निविदाधारकावर बंधनकारक राहील.

26) **प्रत्यक्षात टँकर पुरविण्याचे आदेश दिल्यावर त्या आदेशाच्या दिनांकापासून 24 तासामध्ये टँकर आदेशात नमूद केलेल्या ठिकाणी उपलब्ध करुन द्यावे लागेल. आवश्यकतेनूसार टँकर लावण्याचे अथवा बंद करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांचे राहतील. केवळ निविदा मंजूर झाली म्हणून काम देणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.**

27) यशस्वी निविदाधारकाकडून करारनाम्याप्रमाणे पूर्ण क्षमतेने काम करुन घेण्याचे अधिकार संबंधीत गटविकास अधिकारी यांना राहतील. त्यासाठी टँकरची क्षमता, मार्ग व खेपा ठरविणे याबाबतचे अधिकार गटविकास अधिकारी यांना राहतील. गटविकास अधिकारी यांनी दिलेले आदेश यशस्वी निविदाधारकावर बंधनकारक राहतील.

28) टँकरला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रतिकिमी भाडे हे 1 मे.टन एककाच्या प्रमाणात देण्यात येईल.

29) पिण्याचे पाणी वाहतुकीचा कालावधी या कार्यालयाचे आदेश दिलेपासून दिनांक 30/06/2026 अखेर किंवा टंचाई कालावधी संपेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

30) जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती लक्षात घेता अशा परिस्थितीत जिल्हाधिकारी निविदाधारकांना कामासाठी मुदतवाढ देऊ शकतात. मुदतवाढ मिळाल्यास काम करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

31) निविदेमध्ये नमुद केलेले दर सर्व समावेशक असावेत. त्याबाबत इतर कोणतीही वेगळी भरपाई दिली जाणार नाही. मंजूर झालेल्या निविदेतील दरामध्ये वाढ केली जाणार नाही.

32) निविदाधारक/सहकारी संस्था यांना काळ्या यादीत घोषित केलेले असल्यास अशा निविदाधारक /सहकारी संस्था यांनी निविदा भरु नयेत. असे आढळून आल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

33) निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा धारकास टँकरवर " **महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा** : पाणी **भरण्याचे ठिकाण व पाणी पुरवठयाची ठिकाणे** " अशा माहितीचा बोर्ड ठळक अक्षरात टँकरच्या दर्शनी भागावर लावावा लागेल.

34) जिल्हयात पाणी पुरवठा करतांना टँकरला भरावा लागणारा पथकर (Toll Tax) संबंधीत वाहतूक ठेकेदारास भरावा लागेल.

35) टँकरचे लॉगबुक एक प्रतीत ठेवावे लागेल. लॉगबुक सर्व नोंदीची अद्यावत ठेवणेची जबाबदारी संबंधीत टँकर चालकाची राहिल. टँकरचे लॉगबुक गहाळ झाल्यास त्या कालावधीचे बील अदा केले जाणार नाही.

36) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रं.टंचाई /1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24 जानेवारी, 2006 नुसार मंजूर खेपा होत असलेबाबत प्रत्येक खेपेच्या वेळी त्या त्या गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी तारीख व वेळेसह लॉगबुक वर घेणे टँकर चालकावर बंधनकारक राहील.

37) उद्‌भवाच्या ठिकाणी उद्‌भव नोंदवही ठेवण्यात येईल. त्यावर प्रत्येक खेपेच्या वेळी दिनांक व वेळेसह टँकर भरल्याची नोंद घेवून टँकरच्या लॉगबुक वर सर्व रकाने भरण्याची जबाबदारी टँकर चालकाची राहील.

38) निविदाधारकाने सादर केलेले दर हे निविदा उघडण्याच्या दिनांकापासून 90 दिवसापर्यंत स्विकृतीस पात्र (विधीग्राहय) राहतील.

39) संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी तालुक्यात नेमलेल्या पर्यवेक्षक तथा समन्वयक कर्मचाऱ्याने प्रत्येक टँकरने दररोज केलेल्या खेपांची माहिती त्याच दिवशी गटविकास अधिकारी यांना अगर त्यांनी प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्यास देणे बंधनकारक राहील.

40) सादर करावयाचे दर हे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.

41) निविदा फॉर्मच्या प्रत्येक पानावर निविदा धारकाने किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

42) निविदाधारक संस्थेच्यावतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदेसंबधीच्या बैठकांना उपस्थित रहाण्यास किंवा तांत्रिक व इतर माहिती पुरवण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास, त्या संबधीचे निविदाधारकांचे प्राधिकारपत्र (Bidders Power of Attorney) देणे आवश्यक आहे.

43) निविदाधारकाने निविदा सादर करतांना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी/शर्ती, नियम याव्यतिरिक्त स्वतःची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ठ करु नये. अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

44) या ई-निविदे संदर्भात निविदा प्रक्रियेचे दरम्यान किंवा निविदा स्विकृतीनंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास जिल्हाधिकारी नंदुरबार यांचा निर्णय अंतिम राहिल. तसेच नंदुरबार जिल्हा न्यायालयाच्या कक्षेत राहील.

45) करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास जिल्हाधिकारी नंदुरबार ठरवतील ती रक्कम किंवा संपूर्ण सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.

46) निविदाधारकाने निविदा प्रक्रियेवर परिणाम करेल अशा भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्यास किंवा निविदा प्रक्रियेशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखविणे, दबाव आणणे अशा मार्गाचा अवलंब केल्याचे जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आल्यास सदर निविदाधारकाची निविदा अपात्र करण्यात येईल.

47) बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत यासाठी कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

48) खरेदी केलेला निविदा फॉर्म हा अहस्तांतरणीय आहे. ज्या व्यक्ती किंवा संस्थेने निविदा फॉर्म खरेदी केला असेल त्यांनाच निविदा सादर करता येईल.

49) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा फेर-निविदा मागविल्यास निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी राखून ठेवला आहे.

50) शा.नि. दि. 24/01/2006 मधील सर्व तरतुदी व शासन वेळोवेळी सुधारीत करेल अशा सर्व अटी शर्ती निविदाधारकास मान्य रहतील.

निविदाकाराची स्वाक्षरी:-
निविदाधारकाचे नाव :-
संपर्क क्रमांक :-
संपर्क पत्ता:-

(धनंजय गोगटे)
**जिल्हाधिकारी नंदुरबार**

**प्रपत्र - 1**

टँकर पुरवठ्याचे काम करण्यास तयार असलेबाबत तसेच त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास जबाबदारीबाबत संस्थेच्या संचालक मंडळाचा ठराव

---

दिनांक - / /2026

विषय नं. नंदुरबार जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी सन 2025-26 ची टँकरचा पुरवठा निविदा भरण्याबाबत, निविदा मंजूर झालेनंतर काम सुरळीत पारपाडणे व त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास जबाबदारीबाबतच्या ठरावाबाबत.

ठराव नं. मा.जिल्हाधिकारीसो, नंदुरबार यांनी दिनांक / /2026 रोजी सन 2025-26 करीता जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणेकरीता टँकर पुरवठा निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी संस्थेने/व्यक्तीने निविदा भरुन देऊन संस्थेच्या/व्यक्तीच्या ट्रक/टँकर मालक सभासदांना काम उपलब्ध करुन द्यावे. संस्थेची निविदा मंजूर झालेनंतर सदरचे काम सुरळीत पार पाडणेकामी संचालक मंडळ तयार असून त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास संस्थेचे संचालक मंडळ जबाबदार राहिल. असे सर्व उपस्थीत संचालकांच्या वतीने एकमताने ठरले. त्यास ही सभा संमती देत आहे

सुचकाचे नांव व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नांव व स्वाक्षरी

संचालकांची नावे व स्वाक्षरी

**प्रपत्र - 2**

शासकिय/निमशासकिय संस्थांना पाणी पुरवठा केलेबाबत अनुभवाचे प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, ----------------------------------------------------------पत्ता -------- ----------------------------------या संस्थेने दिनांक / / ते / / या कालावधीत पिण्याचे पाणी पुरवठ्याचे काम दिलेल्या आदेशाप्रमाणे समाधानकारक रित्या पूर्ण केलेले आहे.

ठिकाण -

दिनांक -

सही-

सिक्का

पदनाम-

**प्रपत्र- 3**

निविदेतील अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

( 500/- रुपये स्टॅम्प पेपरवर द्यावयाचा मजकूर )

मी, ------------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------- याद्वारे शपथेवर निवेदन करतो की, मी मा.जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामिण भागातील गावे / वाड्या / तांडे यांना पिण्याचे पाण्याचे टंचाई अंतर्गत दि.    /    /2026 रोजी काढलेल्या पिण्याचे पाण्याचे वाहतूकीचे निविदेतील अटी व शर्ती पूर्णपणे वाचून समजावून घेतलेल्या आहेत. पिण्याचे पाणी वहातूक निविदेतील अटी आणि शर्ती मला मंजूर असून त्या अटी व शर्तीचे मी पूर्णपणे पालन करील.

मी असेही शपथेवर निवेदन करतो की, पिण्याच्या पाण्याची टंचाई ही अतिसंवेदनशील बाब असल्याचे मला मान्य आहे. मी नंदुरबार जिल्ह्यातील गांवे, वाड्या, तांडे यांना माझी पिण्याचे पाण्याची वाहतूक निविदा मंजूर झाल्यास आवश्यकतेनुसार माझे स्वतःचे अथवा टँकर्स / ट्रक मालकासोबत केलेल्या करारनाम्याच्या आधारे इंधनासह वाहने पुरविल. तसेच करार केलेल्या टँकर/ट्रक संबंधी रोड टॅक्स, इन्शुरन्स, फिटनेस, परमिट, नोंदणी प्रमाणपत्र, पी.यु.सी. व व्यवसाय कर इत्यादी बाबत पूर्तता करील.

वरील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे वाहने न पुरविल्यास निविदेत नमूद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार दंडणीय कार्यवाहीस पात्र राहील. तसेच टँकर/वाहने न पुरविल्यास मी भा.द.वि.कलम 199 व 200 प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदर मजकूर मी आज दि.   /    /2026 रोजी मुक्कामी प्रमाणित केलेला आहे.

निविदा धारक यांची स्वाक्षरी

संपूर्ण नांव व पत्ता.

( सदरचा मजकूर कार्यकारी दंडाधिकारी, यांचेसमोर नोंदविलेला असावा.)

प्रपत्र- 4

# BIDDER'S POWER OF ATTORNEY

To,

<Bidder's Name>--------------------------------------------------------------------------, <Designation>-------------------------------is hereby authorized to sign relevant documents on behalf of the company in dealing with Tender of reference <Tender No. & Date>-------------------------------. He is also authorized to attend meetings & submit technical & commercial information as may be required by your in the course of processing above said tender.

Thanking You,

Authorized Signatory.

-----------------------------------------------------------------

Tenderers

Seal

प्रपत्र- 5

## Bidder's Information

## IN RESPONSE TO THE PRIVATE WATER SUPPLY BY TRUCK / TANKER TENDER NOTICE PUBLISHED BY THE COLLECTOR, Nandurbar READ WITH TERMS & CONDITIONS CONTAINED

## IN THE TENDER FORM

1. Name in Full of the Tenderer :

(in Block Letters)

2. Address of the Tenderer :

:

:

:

Telephone No. : office ...............................

: Residence ........................

Mobile No. :

Fax No. :

3. Address for Communication :

Telephone No. : office Resi. ............................

Mobile No. :

Fax No. :

I / We have carefully read and understood the above terms and conditions of the Tender attached to this offer and form part of this Tender, which we accept unconditionally and accordingly, offer the price as above mentioned.

**Signature :------------------------**

**Name :**

**Date :**

**Designation :**

**Seal / Rubber Stamp of Organization**

**Signature Of Tenderer**

प्रपत्र -6

## Banker's / CA's Certificate for Investible Funds

Ref :-------------------------------------------- Date : ----------------------

To,

In response to the Tender No. ---------------------------------dt.----------------- of the, Dhule-------- -------------------------- of The Private Water Supply By Truck / Tanker Tender, this is to certify that ----------------------------------------------------------------------(Name of Bidder) is having balance of Rs. -----------------------------in their account & are capable of investing funds to the extent of Rs. ------------------------------(Ruppes ---------------------------------------------------------) for the said tender.

DATE :

PLACE: SIGNATURE :

Taluka / FDO.

-----------------------------------

(BANK'S COMMON SEAL)

**Signature Of Tenderer**

**प्रपत्र -7**

(यशस्वी निविदाधारकाने RTO कढून सदरचा दाखला प्रमाणित करुन घ्यावा)

दाखला

ट्रक टँकरव्दारे पाणीपुरवठा निविदा सन 2025-26

वाहन तपशिला संबंधी विवरणपत्र

निविदाधारक संस्थेचे / व्यक्तीचे नांव ------------------------------------------------------------

| अ.क्र. | ट्रक / टँकर क्रमांक | टॅक्स मुदत | PUC | व्यवसायकर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |
| 7 | | | | |
| 8 | | | | |
| 9 | | | | |
| 10 | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील नमुद टँकर हे निविदा धारक संस्थेचे / व्यक्तीचे स्व. मालकीचे असून सदर वाहनाचे सर्व कादपत्रे आज अखेर मुदतीत परीपुर्ण आहेत.

निविदाधारकाचे विनंती वरुन सदर दाखला दिला असे.

ठिकाण :-

दिनांक :-

सही/-
परिवहन अधिकारी

## जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

## पिण्याचे पाणी वाहतूक ई-निविदा सुचना

नंदुरबार जिल्ह्यामध्ये दि.07 /05/2026 ते 30/06/2026 या कालावधीत टंचाईग्रस्त गावात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या टँकर पुरवठा संस्थां/व्यक्ती कडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. निवड होणा-या संस्थेस सर्वसाधारण 6000 ते 12000 लिटर किंवा आवश्यकतेनुसार त्यापेक्षा अधिक क्षमतेचे टँकर पुरविणेकामी जिल्हाधिकारी नंदुरबार ई-निविदाद्वारे जाहिररित्या दर मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | तपशिल | | सुरवात दिनांक व वेळ (पासुन) | अंतिम दिनांक व वेळ (पर्यंत) | लिफाफे |
|---|---|---|---|---|---|
| | कार्यालयीन स्तर | ई-निविदा धारक स्तर | | | |
| 1 | निविदा प्रकाशित करणे | --- | 28/04/2026 सकाळी 11.00 | 05/05/2026 दुपारी 3.00 | तांत्रिक लिफाफा |
| 2 | --- | ऑनलाईन निविदा खरेदी व डाऊनलोड करणे | 28 /04/2026 सकाळी 11.00 | 05/05/2026 सायं. 4.00 | तांत्रिक लिफाफा |
| 3 | --- | ऑनलाईन निविदा भरणे | 28 /04/2026 सकाळी 11.00 | 05/05/2026 दुपारी 3.00 | तांत्रिक लिफाफा |
| 4 | तांत्रिक लिफाफा उघडणे | --- | 06 /05/2026 दुपारी 01.00 वा. | --- | तांत्रिक लिफाफा |

1) सदर ई-निविदाचे संपूर्ण अटी व शर्ती जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे **www.Nandurbar.nic.in** व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहे.

2) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा काहीही कारण न दाखविता रद्द करणेचे अधिकार जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी राखून ठेवले आहेत.

क्र./टंचाई/कावि/95/2026
नंदुरबार, दि.23/04/2026

(धनंजय गोगटे)
**जिल्हाधिकारी नंदुरबार**

Signature Not Verified
Digitally signed by Mahendra Gulab Gavit
Date: 2026.04.27 12:50:19 IST
Location: Maharashtra-MH